# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 22 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- जल जीवन मिशनमुळे ग्रामीण भागातल्या नागरिकांच्या जीवनात परिवर्तन–राष्ट्रीय जल पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपतींचं प्रतिपादन–महाराष्ट्राला विविध पाच श्रेणीत पुरस्कार
- विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी–परभणी जिल्ह्यात पहिल्याच दिवशी दोन अर्ज
- इच्छुक उमेदवारांच्या पक्षांतराला वेग–भाजपचे माजी मंत्री राजकुमार बडोले राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल तर निलेश राणे उद्या शिवसेनेत प्रवेश करणार

आणि

- नांदेड तसंच हिंगोली जिल्ह्याला भूकंपाचे सौम्य धक्के

****

जल जीवन मिशन अभियानामुळे ग्रामीण भागातल्या नागरिकांच्या जीवनात परिवर्तन आल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण केल्यानंतर त्या बोलत होत्या. पाणीसाठा वाढवणं आणि त्याचं संरक्षण याला प्रोत्साहन देण्यात येत आहे, मात्र भूमिगत जलप्रदूषणाला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजनांच्या आवश्यकतेकडे राष्ट्रपतींनी लक्ष वेधलं. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या वतीनं नऊ श्रेणींमध्ये ३८ जणांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट राज्याच्या श्रेणीमध्ये प्रथम पारितोषिक ओडिशानं मिळवलं, तर उत्तर प्रदेशनं दुसऱ्या क्रमांकाचं पारितोषिक पटकावलं. तिसऱ्या क्रमांकाचं पारितोषिक गुजरात आणि पुद्दुचेरीनं संयुक्तपणे मिळवलं आहे.

महाराष्ट्राला विविध श्रेणींमध्ये पाच पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या श्रेणीत पुणे महानगर पालिकेला तिसरा पुरस्कार, सर्वोत्कृष्ट उद्योग या श्रेणीत रेमंड युको डेनिम प्रायवेट लिमिटेड या कंपनीला तिसरा, सर्वोत्कृष्ट जल व्यवस्थापनात बुलडाणा जिल्ह्यातल्या पैनगंगा नदीवरील पैनटाकळी प्रकल्पाला प्रथम पुरस्कार तसंच सवोत्कृष्ट नागरी समाज या श्रेणीत पहिले आणि दुसरे पुरस्कार अनुक्रमे बीएआयएफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन, पुणे आणि नाशिकच्या युवा मित्रा, मित्रांगण कॅम्पसला मिळाला आहे.

****

भारत संचार निगम लिमिटेड–बीएसएनएलच्या ग्राहक संख्येत गेल्या सहा महिन्यांत एक कोटी ऐंशी लाख इतकी वाढ झाली आहे. आज नवी दिल्ली इथं बीएसएनएचं नवीन संकेत चिन्ह आणि सात नवीन सेवांचं उद्घाटन केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. बीएसएनएलने 4G नेटवर्क सुरू केल्यापासून ग्राहकांची संख्या वाढली असून स्वतःचे 4G नेटवर्क विकसित करणारा भारत हा जगातील सहावा देश आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज जारी झाली. त्यानंतर राज्यभरात नामनिर्देशन प्रक्रियेला आजपासून प्रारंभ झाला. येत्या २९ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून, ३० तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी याच वेळापत्रकाप्रमाणे नामनिर्देशन प्रक्रिया पार पडणार आहे. सर्व ठिकाणी २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

आज पहिल्याच दिवशी परभणी विधानसभा मतदार संघात एक नामनिर्देशन पत्र दाखल झालं. राष्ट्रवादी काँग्रेसकडून हा अर्ज दाखल केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पाथरी विधानसभा मतदार संघात आज १८ जणांनी ५२ अर्ज खरेदी केले तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. गंगाखेड विधानसभा मतदार संघातून आज १७ जणांनी २७ उमेदवारी अर्ज घेतले.

नांदेड जिल्ह्यात आज एकही उमेदवारी अर्ज भरण्यात आला नाही, मात्र २०० पेक्षा जास्त उमेदवारांनी ४११ अर्जांची उचल केली आहे.

अकोला जिल्ह्यात आज पाचही विधानसभा मतदारसंघात एकही नामनिर्देशन पत्र दाखल झालं नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात आज पहिल्या सहा विधानसभा मतदारसंघात २१६ अर्जांची उचल करण्यात आली असून एकही नामांकन अर्ज दाखल झाला नाही.

****

नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी आपल्या जिल्हाध्यक्षपदाचा आणि सदस्यपदाचा राजीनामा आज भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे दिला. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

****

बीडमधले भाजप नेते राजेंद्र मस्के यांनी आज मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. म्हस्के यांनी दोन दिवसांपूर्वीच भाजपाच्या जिल्ह्याध्यक्ष पदाचा राजीनामा दिला.

****

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत हा प्रवेश सोहळा पार पडला.

****

भाजपचे नेते माजी खासदार निलेश राणे हे उद्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ इथं होणाऱ्या जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात प्रवेश करणार आहेत. निलेश राणे यांनी आज कुडाळ इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष केदा आहेर यांना चांदवड-देवळा विधानसभा मतदारसंघात भाजपने तिकीट नाकारल्याने देवळा नगरपंचायतीच्या १५ नगरसेवकांसह २ स्वीकृत नगरसेवकांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपले राजीनामे भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार यांच्याकडे सादर केले आहेत.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पन्नास हजार रूपयांपेक्षा जास्त रकमेची विनाकारण वाहतूक करणाऱ्या व्यक्तींवर आचार संहितेच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यात १३० पथकांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीणा यांनी दिली.

****

उमेद अभियानातील एक लाख ८२ हजार २०० स्वयंसाहाय्यता समूहातील महिलांनी आज एकाच वेळी विविध गावांमधून मतदान जनजागृती शपथ घेतली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत आणि उमेदचे जिल्हा अभियान सहसंचालक डॉ. संतोष तुबाकले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

दरम्यान, नांदेड जिल्हयातल्या सर्व पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेच्या विविध कार्यालयातून तीस हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आज मतदानाची शपथ घेतली. दरम्यान, जिल्ह्यातील नऊ विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणूक जनजागृतीसाठी आज जिल्हा परिषद इथं कार्यक्रम घेण्यात आला. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून तो वापरणे ही लोकशाहीतील अत्यावश्यक प्रक्रिया असल्याचं प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मतदान जनजागृती कक्षाच्या प्रमुख मीनल करनवाल यांनी यावेळी केलं.

****

नांदेड शहर तसंच अर्धापूर, हदगाव या तालुक्यात आज सकाळी सात वाजेच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिष्टर स्केलवर तीन पूर्णांक आठ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड शहरापासून २९ किलोमीटर दूर उत्तरपूर्व दिशेला हदगाव तालुक्यातल्या सावरगाव या गावात असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. नांदेड शहर आणि परिसर तसंच

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी, वसमत, औंढा तालुक्यातल्या अनेक भागातही हे धक्के जाणवले.

****

धुळे जिल्हा माहिती कार्यालयातील माध्यम नियंत्रण कक्षाला निवडणूक खर्च निरीक्षक रामा नाथन आर यांनी आज भेट दिली. निवडणूक काळात माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीनं पेड न्यूजवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

****

आगामी राष्ट्रकूल स्पर्धांमधून हॉकी, क्रिकेट, कुस्ती, बॅडमिंटन, स्क्वॅश आणि टेबल टेनिस सह अनेक खेळ वगळण्यात आले आहेत. स्कॉटलंडमधल्या ग्लासगो शहरात २०२६ मध्ये होणाऱ्या या स्पर्धांमध्ये केवळ १० खेळांचा समावेश असणार आहे. त्यात ॲथलेटिक्स, जलतरण, आर्टिस्टिक जिम्नस्टिक, नेट बॉल, भारोत्तोलन, मुष्टीयुद्ध, ज्युदो, बाऊल्स, बास्केटबॉल यांचा समावेश आहे. यातल्या काही खेळांमध्ये दिव्यांग खेळाडूही सहभागी होणार आहेत.

****

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरची आयसीसी महिला टी – ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेतल्या टीम ऑफ द टूर्नामेंटमध्ये निवड झाली आहे. आयसीसीनं जाहीर केलेल्या १२ सदस्यीय संघात ती एकमेव भारतीय खेळाडू आहे, या संघात सात देशांच्या खेळाडूंचा समावेश आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या आष्टी तालुक्यात आज सकाळी विजांच्या कडकडाटांसह जोरदार पाऊस झाला. यावेळी कडा इथल्या महेश मंदिराच्या कळसावर वीज पडल्याने कळसाचं नुकसान झालं. तालुक्यात विविध ठिकाणी गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर कायम आहे. यामुळे तालुक्यातील सर्व लघु, मध्यम प्रकल्प ओसंडून वाहत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथलं जायकवाडी धरण पूर्ण भरलं असून, धरणात अहिल्यानगर तसंच नाशिक जिल्ह्यातून पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे सध्या धरणाच्या १८ दरवाजातून सुमारे १८ हजार ८६४ घनफूट प्रतिसेकंद वेगानं गोदावरी नदीपात्रात पाणी सोडलं जात आहे.

****

बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेलं ‘दाना’ चक्रीवादळ ओडिशा किनारपट्टीच्या दिशेनं पुढे सरकत आहे. हे वादळ येत्या गुरुवार आणि शुक्रवार दरम्यानच्या मध्यरात्री ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर तीव्र चक्रीवादळाच्या स्वरूपात धडकेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****